महाराष्ट्र शासन

सामान्य प्रशासन विभाग

शासन आदेश क्रमांकः कअनि - १११७/प्र.क्र.११७/१४-ब

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,

मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२

दिनांक: १० जानेवारी, २०१८

<u>आदेश</u>

मंत्रालयीन विभागातील खाली नमूद केलेल्या कक्ष अधिकाऱ्यांच्या सेवा महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, मुंबई यांच्या अधिपत्याखालील आयोगाच्या कार्यालय/खंडपीठांमध्ये कक्ष अधिकारी या पदावर प्रतिनियुक्तीने दोन वर्षाच्या कालावधीसाठी खालील अटींच्या अधीन राहून सुपूर्द करण्यात येत आहेत

अ क्र	कक्ष अधिकाऱ्यांचे नांव	सध्याचा विभाग	राज्य माहिती आयोगाचे कार्यालय/खंडपीठ
१	श्री.रा.कृ.मिर्जी	अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग	मुख्यालय, मुंबई
२	श्री. ध.र.पुराडउपाध्ये	नियोजन विभाग	नाशिक
३	श्री.नं.ग.राऊत	जलसंपदा विभाग	नागपूर

अ) उपरोक्त नमुद अधिकारी ज्या तारखेला प्रतिनियुक्तीच्या पदावर रुजू होतील त्या तारखेपासून प्रतिनियुक्तीच्या सेवेचा प्रारंभ होईल त्यानंतर दोन वर्षांनी प्रतिनियुक्तीच्या पदाचा कार्यभार सुपूर्द करुन त्यांच्या मूळ विभागात ज्या तारखेला रुजू होतील त्या तारखेला त्यांचा प्रतिनियुक्तीचा कालावधी समाप्त होईल.

ब) जर त्यांची सेवा लोकसेवेच्या हिताच्या दृष्टीने शासनाला आवश्यक वाटली तर प्रतिनियुक्तीचा कालावधी संपण्यापूर्वी कोणत्याही वेळी त्याला परत बोलावून घेण्याचा अधिकार शासन/सक्षम प्राधिकारी राखून ठेवील.

क) जर त्यांची सेवा स्वीयेत्तर नियोक्त्याला आवश्यक वाटली नाही तर त्यांना मूळ विभागाकडे परत पाठवण्याची मुभा स्वीयेत्तर नियोक्त्याला राहील. मात्र याप्रमाणे परत पाठवण्यापूर्वी स्वीयेत्तर नियोक्त्याने शासनाला/ सक्षम प्राधिकाऱ्याला तीन महिन्यांची नोटीस दिली पाहिजे; आणि

ड) त्यांनी मूळ विभागाकडे परत जाण्याचा आपला उद्देश आहे अशी कमीत कमी तीन महिन्यांची लेखी नोटीस शासनाला/ सक्षम प्राधिकाऱ्याला दिल्यानंतर त्यांना मूळ विभागाकडे परत येण्याची मुभा राहील.

२. म.ना.से.(पदग्रहण अवधी, स्वीयेत्तर सेवा ..इ) नियम १९८१ मधील नियम ४० (परिशिष्ट - दोन) मधील तरतुदी विचारात घेऊन सामान्य प्रशासन विभाग, कार्यासन क्र.६ तसेच संबंधित विभाग यांनी प्रतिनियुक्तीबाबतच्या अटी व शर्ती, आपापसात सल्लामसलत करुन ठरवाव्यात.

३. उपरोक्त अधिकाऱ्यांच्या इतर सर्व प्रशासकीय बाबी संबंधित प्रशासकीय विभाग तसेच सा.प्र.वि./का.६ यांचेमार्फत हाताळण्यात येतील.

४. उपरोक्त अधिकाऱ्यांना प्रतिनियुक्तीच्या ठिकाणी रूजू होण्यासाठी संबंधित विभागांनी तत्काळ कार्यमुक्त करावे.

५. सा.प्र.वि.शा.आ.दिनांक ०७.०८.२०१७ अन्वये, राज्य माहिती आयोग, नागपूर खंडपीठ येथे प्रतिनियुक्तीने कार्यरत असलेले श्री. हि.या.दुफारे, कक्ष अधिकारी यांच्या प्रतिनियुक्तीच्या सेवा प्रत्यावर्तित करून त्यांची पदस्थापना महसूल व वन विभागामध्ये करण्यात आली आहे. म.ना.से. (पदग्रहण अवधी, स्वीयेत्तर सेवा आणि निलंबन, बडतर्फी व सेवेतून काढून टाकणे यांच्या काळातील प्रदाने) नियम, १९८१ चे नियम १२ नुसार अनुज्ञेय पदग्रहण अवधी उपभोगुन श्री. दुफारे, क.अ. यांनी इतर कोणत्याही आदेशाची प्रतिक्षा न करता तत्काळ महसूल व वन विभागामध्ये रूजू व्हावे. श्री. दुफारे हे महसूल व वन विभागामध्ये रूजू न झाल्यास त्यापुढील कालावधी हा त्यांच्या सेवेतील खंड समजण्यात येईल व श्री. दुफारे, क.अ. हे या प्रयोजनार्थ शिस्तभंगविषयक कारवाईस पात्र ठरतील.

सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०११०१५५२४६६५०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Gajanan Bhimrao Gurav

Digitally signed by Gajanan Bhimrao Gurav
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=General Administration, postalCode=400032, st=Andhra Pradesh, 2.5.4.20=8a5b973b0795ae988a7c005050f9180a8021798a5c1ed41ada8a72725a47b4f0, cn=Gajanan Bhimrao Gurav
Date: 2018.01.10 15:56:39 +05'30'

(ग.भि.गुरव)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति

१) श्री. रा.कृ.मिर्जी, कक्ष अधिकारी, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई -३२.
२) श्री.ध.र.पुराडउपाध्ये, कक्ष अधिकारी, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई -३२.
३) श्री. नं.ग.राऊत, कक्ष अधिकारी, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
४) श्री. हि.या.दुफारे, कक्ष अधिकारी, राज्य माहिती आयोग, नागपूर खंडपीठ, प्रशासकीय इमारत क्र.२, सिव्हील लाईन्स, नागपूर.

प्रत,

१) अपर मुख्य सचिव, सामान्य प्रशासन विभाग,/का.क्र.६ मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
२) अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/ सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग/ नियोजन विभाग/ जलसंपदा विभाग/ महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई -३२. (संबंधित विभागांमार्फत)
३) सह/ उप सचिव (आस्थापना), अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग/ नियोजन विभाग/ जलसंपदा विभाग/महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई -३२.
त्यांना विनंती करण्यात येते की, प्रतिनियुक्तीच्या अटी व शर्ती नमूद केलेल्या आदेशाची एक प्रत या कार्यासनाकडे तात्काळ पाठविण्यात यावी.

४) सचिव, महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, नवीन प्रशासकीय भवन, १३ वा मजला, मुंबई - ४०० ०३२

५) उप सचिव, राज्य माहिती आयोग, नाशिक खंडपीठ, शिवनेरी, दुसरा मजला, शासकीय विश्रामगृह, गोल्फ क्लब, नाशिक.

उप सचिव,महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, खंडपीठ, नागपूर, प्रशासकीय इमारत क्र.२, सिव्हील लाईन्स, नागपूर.

६) अवर सचिव/सा.प्र.वि.का.क्र.६, नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर, मुंबई - ४०० ०३२.

७) निवड नस्ती / संग्रहार्थ.